## इटलीचे उप पंतप्रधान व परराष्ट्र व्यवहार व आंतरराष्ट्रीय सहकार मंत्री माननीय श्री. अँटोनियो ताजानी यांची भेट

11 डिसेंबर 2025

इटलीचे उप-पंतप्रधान आणि परराष्ट्र व्यवहार व आंतरराष्ट्रीय सहकार मंत्री माननीय श्री. अँटोनियो ताजानी यांनी 10-11 डिसेंबर 2025 रोजी भारताला भेट दिली. इटलीचे 50-सदस्यीय व्यावसायिक शिष्टमंडळ उप-पंतप्रधान श्री. ताजानी यांच्यासोबत होते. यावर्षी ही त्यांची भारताला दुसरी भेट आहे. याआधी एप्रिल 2025 मध्ये त्यांनी भारताला भेट दिली होती, तेव्हा पहिल्या भारत-इटली व्यवसाय, विज्ञान व तंत्रज्ञान फोरमचे आयोजन करण्यात आले होते.

2. नोव्हेंबर 2025 मध्ये जोहान्सबर्ग येथील G20 परिषदेच्या वेळी पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी आणि इटलीच्या मंत्रिमंडळाच्या अध्यक्षा माननीय श्रीमती जॉर्जिया मेलोनी यांच्या दरम्यान झालेल्या बैठकीनंतर, उप-पंतप्रधान आणि परराष्ट्र व्यवहार व आंतरराष्ट्रीय सहकार मंत्री श्री. ताजानी यांची ही भेट होत आहे.

3. आपल्या भेटीदरम्यान उप-पंतप्रधान आणि परराष्ट्र व्यवहार व आंतरराष्ट्रीय सहकार मंत्री श्री. ताजानी यांनी पंतप्रधानांची भेट घेतली आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री, वाणिज्य व उद्योग मंत्री आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार यांचीही भेट घेतली. पंतप्रधान मोदी यांनी इटलीच्या पंतप्रधान मेलोनी यांना शुभेच्छा दिल्या आणि भारत-इटली द्विपक्षीय संबंधांच्या सकारात्मक प्रगतीबद्दल आनंद व्यक्त केला.

4. परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी उप-पंतप्रधान आणि परराष्ट्र व्यवहार व आंतरराष्ट्रीय सहकार मंत्री श्री. ताजानी यांच्याशी दिल्ली येथे शिष्टमंडळ स्तरीय चर्चा केली आणि द्विपक्षीय सहकार्यावरही संवाद साधला. त्यांनी संयुक्त धोरणात्मक कृती योजना 2025-29 च्या विशेषत: व्यापार व अर्थव्यवस्था, संरक्षण आणि सुरक्षा, दहशतवाद विरोध, अंतराळ, विज्ञान व तंत्रज्ञान, नवोपक्रम, नवीकरणीय ऊर्जा, शिक्षण व लोक संबंध या क्षेत्रांमधील प्रगतीवर समाधान व्यक्त केले. व्यापक व शाश्वत पद्धतीने दहशतवादाचा सामना करण्याच्या संयुक्त वचनबद्धतेच्या अनुषंगाने, दहशतवादाला होणार्या  आर्थिक मदतीला विरोध करण्याच्या भारत-इटली संयुक्त उपक्रमाच्या गतीमान अंमलबजावणीसाठी ते प्रयत्नशील आहेत. दहशतवादाच्या प्रति झिरो टॉलरन्स धोरणाचा भारताने पुनरुच्चार केला. दहशतवादाविरोधात शून्य सहिष्णुता धोरणाचा पुनरुच्चार भारताने केला. सागरी क्षेत्रामधील सुरक्षा, संरक्षण व प्रगती सुधारण्यासाठी सागरी सुरक्षा संवाद स्थापन करण्याच्या दृष्टीने उभय बाजूंनी काम करत आहेत. परराष्ट्र व्यवहार मंत्री आणि उप-पंतप्रधान आणि परराष्ट्र व्यवहार व आंतरराष्ट्रीय सहकार मंत्री श्री. ताजानी यांनी आरोग्य क्षेत्रात कौशल्य व गमनशीलता यांमधील सहयोग बळकट करण्यावर भर दिला. त्यांनी इंडो-पॅसिफिक, युक्रेन, पश्चिम आशिया/मध्य पूर्व, आणि इतर समान हिताच्या प्रादेशिक व जागतिक मुद्यांवरील प्रमुख विकासांवर चर्चा केली.

5. उप-पंतप्रधान आणि परराष्ट्र व्यवहार व आंतरराष्ट्रीय सहकार मंत्री श्री. ताजानी यांची राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार श्री. अजित डोवाल यांच्या सोबतची बैठक ही सुरक्षा सहकार्य आणि प्रादेशिक व जागतिक घडामोडी यांवर आधारलेली होती. उभय बाजूंनी भारत मध्य पूर्व युरोप इकॉनॉमिक कॉरिडोर पुढे नेण्याच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला.

6. वाणिज्य व उद्योग मंत्री श्री. पियुष गोयल यांची उप-पंतप्रधान आणि परराष्ट्र व्यवहार व आंतरराष्ट्रीय सहकार मंत्री श्री. ताजानी यांच्याशी 11 डिसेंबर रोजी मुंबई येथे द्विपक्षीय बैठक झाली आणि द्विपक्षीय व्यापार व गुंतवणूक वाढविण्याच्या व त्यात विविधता आणण्याच्या मार्गांवर चर्चा करण्यात आली. भारत-इटली बिझनेस फोरमचे सुद्धा त्यांनी अध्यक्षपद भूषविले. या भेटीदरम्यान, ऑटोमोटिव्ह, टाकाऊ ते ऊर्जा व नवीकरणीय, क्रीडा तंत्रज्ञान, कृषी-अन्न व जोडणी या क्षेत्रांमध्ये अनेक बिझनेस राउंड टेबल्स घेण्यात आली. दोन्ही मंत्र्यांनी भारतीय उद्योजकांची भेट घेतली आणि भारत-इटली नवोपक्रम उपक्रमावर चर्चा केली.

7. नियमित उच्च-स्तरीय सहभाग, मंत्र्यांमधील संवाद आणि खासगी क्षेत्रातील वाढते संवाद भारत-इटली द्विपक्षीय संबंध ज्यांच्यामुळे, भारत-इटली धोरणात्मक भागीदारी अधिक बळकट व बहुआयामी झाली आहे आणि भारत-इटली द्विपक्षीय संबंध प्रगतीपथावर आहेत.

नवी दिल्ली

11 डिसेंबर 2025